## ऋणनिर्देश

कोणताही अभ्यासविषय निवडताना आवड ही महत्वाची असते. मी ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी असल्यामुळे मला ग्रामीण विकासाची आस आहे. त्या अनुषंगानेच मी खेडयांचा सर्वांगीण विकास साधणाऱ्या व्यक्तीवर एम.फिल. करण्याचा निश्चय केला. त्यामुळे मी 'वि.आ.तथा तात्यासाहेब कोरे ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला. माझ्या आवडीनिवडीला माझे मार्गदर्शक डॉ.के.के.कावळेकर सरांनी तात्काळ सहमती दर्शविली. त्यांची प्रेरणा, जिव्हाळा माझ्या कामामध्ये चैतन्य देणारा ठरला. त्यांनी मार्गदर्शन करत असताना माझ्यावर कृपाकटाक्ष ठेवला. त्याबद्दल त्यांचे प्रथम ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य मानतो.

प्रस्तुत शोधप्रबंध हा माझ्या वडिलांच्या (दादा) आशीर्वादाचे व प्रेरणेचे मूर्त रूप आहे. कोणतेही विधायक कार्य सहकार्याशिवाय पूर्णत्वास पोहचत नाही. या कामी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.लक्ष्मीनारायण तारोडी सर, डॉ.चौसाळकरसर, डॉ.सौ.व्ही.पी.राम मॅडम, डॉ.नानिवडेकर मॅडम, सौ.भारती पाटील मॅडम या गुरूवर्यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले हे नमूद करून त्यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

प्रबंधपूर्तीच्या कामी मा.आमदार विनय कोरे यांचेही विशेष सहकार्य लाभले. त्याचबरोबर वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अधिकारी व सेवक वर्गाचेही सहाय्य लाभले. त्याबद्दल त्या सर्वांचाही मी ऋणी आहे.

याशिवाय जाणता अजाणता सहाय्यभूत ठरलेल्या अशा सर्व मित्रमंडळींचेही आभार मानतो.

दिलीप किसनराव मोहिते